


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २८८ ●रविवार,दि.१८ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# MPSC परिक्षेत राज्यात प्रथम आलेल्या राज्यकर अधिकाऱ्याचा मृतदेह आढळला, हत्या की आत्महत्या?

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग परीक्षेत २०१२ साली राज्यात प्रथम क्रमांक पटकावलेले आणि इंग्रजी व्याकरणाचे लेखक म्हणून ओळख असलेले राज्यकर अधिकारी सचिन नारायण जाधवर यांचा बीड जिल्ह्यात संशयास्पद मृत्यू झाल्याचे समोर आलीये. यामळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. हा मृत्यू हत्या आहे की आत्महत्या, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असून पोलीस प्रशासनाकडून सखोल तपास सुरू आहे.

राज्यकर अधिकारी सचिन जाधवर यांचा मृतदेह आढळल्याने खळबळ : अधिकची माहिती अशी की, सचिन जाधवर यांच्या पत्नीने आज सकाळी ते रात्री घरी परत न आल्याने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल



### ● हत्या की आत्महत्या तपास सुरु ?

**दरम्यान, हा मृत्यू आत्महत्येने झाला की त्यांची हत्या करण्यात आलीये ? याबाबत कोणताही अधिकृत निष्कर्ष अद्याप काढण्यात आलेला नाही. जाधव यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, त्यांनी आत्महत्या केली की त्यांची हत्या करण्यात आली, याचा उलगडा शवविच्छेदन अहवाल आणि पुढील तपासानंतरच होणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.**

केली होती. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम सुरू केली. मात्र काही तासांतच बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्रामीण भागात एका गाडीमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.


प्राथमिक माहितीनुसार, ज्या कारमध्ये सचिन जाधवर यांचा मृतदेह आढळून आला, त्या गाडीमध्ये एक मडके सापडले असून गाडीच्या खालीही एक मडके आढळून आले आहे. विशेष म्हणजे या मडक्यांमध्ये कोळसे असल्याची माहिती समोर आली आहे. ही बाब अत्यंत संशयास्पद असून मृत्यूच्या कारणांबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी बीड जिल्हा रुग्णालयात पाठवला आहे.

सचिन जाधवर हे अत्यंत हुशार, अभ्यासू आणि प्रामाणिक अधिकारी ▶ उर्वरित पान २ वर

## 'ज्ञानराधा बँक' घोटाळ्याचे आरोपी कुटे पती-पत्नीला आणणाऱ्या पोलीस व्हॅनची मोटार सायकल ला धडक; २ गंभीर जखमी

**नेकनूर । प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टीस्टेट बँक घोटाळा प्रकरणात अटकेत असलेले मुख्य आरोपी सुरेश कुटे आणि त्यांची पत्नी अर्चना कुटे यांना केज येथून बीड पोलिसांच्या ताब्यात देण्यासाठी त्यांना पोलीस व्हॅन मध्ये घेऊन येत असताना भीषण अपघात आज सायंकाळी झाला. नेकनूर-येळंब रस्त्यावर पाच वाजण्याच्या सुमारास पोलिसांच्या व्हॅन ची एका मोटरसायकलशी समोरासमोर धडक झाली. या अपघातात मोटरसायकलस्वार गंभीर जखमी झाला असून त्याचा पाय अक्षरशः तुटल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. अपघात इतका भीषण होता की मोटरसायकलचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



जखमी मोटरसायकलस्वाराला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, या अपघातात पोलिसांच्या ताब्यात असलेल्या अर्चना कुटे यांनाही दुखापत झाल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्यावरही वैद्यकीय तपासणी करून उपचार करण्यात



येत असून प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती आहे. आरोपी सुरेश कुटे यांना कोणतीही गंभीर दुखापत झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिस घटनास्थळी दाखल झाले.

▶ उर्वरित पान २ वर

# माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना अंबाजोगाई जिल्हा सत्र न्यायालयाकडून दिलासा

## मुंजा गित्ते जमीन खरेदी खटला पुनरुज्जीवित करण्यास स्थगिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जगमित्र शुगर्स या प्रस्तावित कारखान्यासाठी जमीन खरेदी प्रकरणात माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांच्या सह तिघांविरुद्ध फसवणूक केल्याच्या खटल्यात अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. त्यावर अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात हा खटला पुन्हा सुरू करण्याचा अर्ज केल्यानंतर न्यायालयाने तो खटला पुनरुज्जीवित करण्याच्या दिलेल्या निर्णयावर धनंजय मुंडे



यांनी केलेल्या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर स्थगिती दिली आहे. न्यायालयात धनंजय मुंडे यांच्या वतीने त्यांचे वकील ॲड. अशोक कवडे यांनी स्थगिती अर्ज दाखल केला होता. धनंजय मुंडे यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील दाखल करे पर्यंत किंवा अपिलाची मुदत पूर्ण होई पर्यंत हा खटला चालविण्यास अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने ही स्थगिती दिली आहे. २०११ -१२ साली खरेदी केलेल्या या जमिनीच्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या विरोधात बर्दापूर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली, तत्कालीन परिस्थितीत पोलिसांनी तपास करून तक्रारीत तथ्य न आढळल्याने गुन्हा दाखल केला नाही, त्यानंतर उच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल करून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. या खटल्यात दोन्ही पक्षांचे म्हणणे, साक्ष, पुरावे इत्यादी वस्तुस्थिती ▶ उर्वरित पान २ वर






*ॲड.गोविंद नवनाथ शिराळे यांची भारतीय जनता पार्टी कडून स्वीकृत नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल भाजपाचे माजी आमदार आदिनाथराव नवले पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या या प्रसंगी संपादक दत्तात्रय नरनाळे, महेंद्रसिंग वाघमारे. आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

## अंबाजोगाईकरांचा पाणीप्रश्न लवकरच सुटणार; ७ कि.मी. नवीन पाईपलाईनची चाचणी यशस्वी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या विशेष पाठपुराव्यातून प्रगतीपथावर असलेल्या २०६ कोटी रुपयांच्या नवीन नळ पाणीपुरवठा योजनेचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आज यशस्वीपणे पूर्ण झाला. धनेगाव ते अंबाजोगाई दरम्यान टाकण्यात आलेल्या सुमारे ७ किलोमीटर लांबीच्या नवीन मुख्य जलवाहिनीची (पाईपलाईन) आज यशस्वी चाचणी पार पडली. शहरातील वाढती



लोकसंख्या आणि वारंवार उद्भवणारी पाणीटंचाई लक्षात घेता, अंबाजोगाईकरांना नियमित आणि मुबलक पाणी मिळावे यासाठी ही नवी योजना कार्यान्वित केली जात आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी या योजनेसाठी शासनस्तरावर मोठा निधी उपलब्ध करून देत कामाचा सातत्याने पाठपुरावा केला होता. आज या ७ किलोमीटर पाईपलाईनमधून पाणी यशस्वीपणे प्रवाहित झाल्याने शहराचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागण्याच्या दिशेने मोठे यश मिळाले आहे. या महत्त्वपूर्ण विकासकामामुळे अंबाजोगाईकरांना मोठा दिलासा मिळणार ▶ उर्वरित पान २ वर











## वेदनेला अंत नाही....

आणि खंत फक्त बोलण्यात उरली आहे.
महाराष्ट्रात निकालांचे फटाके फुटत आहेत.
शहरं झगमगत आहेत.
विजयी घोषणा, मिरवणुका, जल्लोष सुरू आहे.
पण याच महाराष्ट्रात
वैजापूरमध्ये आघूर गावात
एका घराचं दार कायमचं बंद झालं आहे.
सोमनाथ पानडघळे.
पेशाने वायरमन.
घरी चुल पेटवण्यासाठी,
मुलांच्या शिक्षणासाठी,
कुटुंबाच्या पोटासाठी
दररोज जीव मुठीत घेऊन खांबावर चढणारा माणूस.
आज त्याच खांबावर
वीज आली आणि सोमनाथ गेले.
तो अपघात नव्हता.
ती आपली निष्काळजी व्यवस्था होती.
ती आपली सामूहिक बेपर्वाई होती.
ती आपली जबाबदारी नाकारणारी मानसिकता होती.
प्रश्न अनेक आहेत, पण शांतता जास्त आहे.
डवीज बंद असल्याची खात्री कुणी केली?
डसुरक्षेची साधने कुठे होती?
डकामगाराच्या जीवापेक्षा घाई मोठी होती का?
डमृत्यूनंतरच का सगळे चौकशी करतात?
आपण सगळेच दोषी आहोत.
कारण आपण हे घडत असतानाही
आपल्याला काय? असं म्हणत राहिलो.
आज कुणी निवडणूक जिंकली असेल,
पण सोमनाथचं कुटुंब आयुष्यभर हरलं आहे.
त्या घरात आज–
कोणी हसणार नाही,
कोणी वाट पाहणार नाही,
कोणी बाबा आले म्हणणार नाही.
आणि उद्या
हा सोमनाथ कुणाचाही असू शकतो.
तुमचा माझा आपल्यातलाच कुणी.
ही फक्त श्रद्धांजली नको.
ही जबाबदारीची जाणीव असली पाहिजे.
ही व्यवस्था बदलण्याची सुरुवात असली पाहिजे.
सोमनाथ पानडघळे अमर राहो
पण पुन्हा कुणाचाही सोमनाथ जाऊ नये,
याची काळजी आपण घेतली पाहिजे.

# World Snow Day आणि माझे शहर

World Snow Day हा दिवस जगभरात दरवर्षी हिवाळ्यात साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश लोकांमध्ये बर्फ, हिवाळी खेळ आणि निसर्गाबद्दल प्रेम निर्माण करणे हा आहे. बर्फाच्छादित प्रदेशात राहणाऱ्या लोकांसाठी हा दिवस नेहमीचा असतो, परंतु आपल्या शहरात कधीही हिमवर्षाव होत नाही. म्हणूनच, माझ्या शहरात अचानक snowfall झाला, तर तो दिवस अत्यंत खास आणि अविस्मरणीय ठरेल.

सकाळी उठताच संपूर्ण शहर पांढऱ्या शुभ्र बर्फाने झाकलेले दिसेल. रस्ते, इमारती, झाडे, डोंगर, गाड्या सगळीकडे बर्फाची चादर पसरलेली असेल. नेहमी गजबजलेले आणि गोंगाटाने भरलेले शहर त्या दिवशी शांत, स्वच्छ आणि सुंदर भासेल. थंडगार वारा वाहत असेल आणि सूर्यकिरण बर्फावर पडून संपूर्ण परिसर उजळून निघेल. हिमवर्षाव पाहताच लहान मुलांचा आनंद गगनात मावणार नाही.



मुले घराबाहेर येऊन बर्फाचे गोळे करून खेळतील, एकमेकांवर बर्फ फेकतील आणि स्नोमॅन बनवतील. काही मुले घसरगुंडीचा आनंद घेतील. तरुण वर्ग मोबाइल आणि कॅमेऱ्यांच्या मदतीने फोटो व व्हिडिओ काढून हा अनोखा अनुभव जपून ठेवेल. ज्येष्ठ नागरिकही बालपणाची आठवण काढत या दृश्याचा आनंद घेतील.

या निमित्ताने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबवले जातील. विद्यार्थ्यांना हिमवर्षावाची माहिती, हिवाळी खेळांचे महत्त्व, तसेच पर्यावरण संवर्धनावर मार्गदर्शन केले जाईल. काही ठिकाणी बर्फाशी संबंधित प्रदर्शन, निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या जातील. त्यामुळे हा दिवस केवळ आनंदाचा नसून ज्ञानवर्धकही ठरेल.

हिमवर्षावामुळे शहरात काही अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. थंडी वाढेल, रस्ते निसरडे होतील आणि वाहतूक मंदावेल. दैनंदिन जीवनावर थोडासा परिणाम होईल. मात्र अशा वेळी लोक एकमेकांना मदतीचा हात देतील. गरजू लोकांना उबदार कपडे, चहा आणि मदत पुरवली जाईल. यामुळे समाजातील एकोपा आणि माणुसकीचे दर्शन घडेल.

या हिमवर्षावातून निसर्गाचे महत्त्व अधिक ठळकपणे समोर येईल. हवामानातील बदल, पर्यावरणाचा समतोल आणि निसर्गाशी असलेले आपले नाते याची जाणीव सर्वांना होईल. निसर्ग जपण्याची जबाबदारी आपलीच आहे, हे लोकांच्या मनावर ठसवले जाईल.

जर माझ्या शहरात हिमवर्षाव झाला, तर World Snow Day हा केवळ उत्सव न राहता आनंद, शिक्षण आणि निसर्गप्रेम यांचा संगम ठरेल. असा दिवस आयुष्यात क्वचितच येतो आणि तो प्रत्येकाच्या मनात कायमचा घर करून राहील.

**– शबनम मुजीब खान**
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

# हळदी–कुंकू समारंभातील धार्मिकता जोपासा !

हिंदू धर्मातील केवळ एक सण वगळता सर्व सण हे प्राचीन कालगणनेनुसार कोणत्या ना कोणत्या तिथीला येतात. सौर कालगणनेनुसार येणारा एकमेव हिंदू सण म्हणजे मकर संक्रांत. सूर्य या दिवशी मकर राशीत प्रवेश करतो म्हणून या दिवसाला मकर संक्रांत असे म्हटले जाते. दरवर्षी मकर संक्रांत १४ जानेवारीला साजरी करण्याचा प्रघात आहे. सुर्यभ्रमणामुळे पडणारे अंतर भरून काढण्यासाठी काही वेळा संक्रांत एक दिवस पुढे ढकलली जाते म्हणजे १५ जानेवारीला असते. एकमेकांमधील हेवेदावे विसरून तिळगुळ खाऊन गोड बोलण्याचा संदेश देणारा हा सण लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्याच आवडीचा सण आहे. संक्रांतीला हिंदू धर्मात देवता मानले जाते. या देवतेने संकरासुर नावाच्या दैत्याला ठार मारले तो दिवस संक्रांत आणि दुसऱ्या दिवशी किंकरासुराला ठार केले तो दिवस किंक्रांत म्हणून ओळखला जातो. या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरु होते. उत्तरायणात मृत्यू येणे अधिक चांगले समजले जाते. शरशय्येवर ५८ दिवस पडून असलेल्या पितामह भ्रिष्मांनी सुद्धा उत्तरायण सुरु झाल्यानंतर देहत्याग केला.

संक्रातीच्या दिवसापासून पुढे रथ सप्तमीपर्यंत घरोघरी हळदी कुंकू घालण्याचा प्रघात आहे. एरव्ही एकमेकांची उणीधुणी काढण्याची एकही संधी न सोडणाऱ्या स्त्रिया शेजार पाजारच्या सुवासिनींना घरी बोलावून त्यांना हळद कुंकू लावतात आणि वाण म्हणून एखादी वस्तू देतात. सुवासिनीच्या रूपात साक्षात देवीचे घरी आगमन झाले आहे या भावाने आलेल्या सुवासिनीला हळद कुंकू लावून तिचे पूजन केले जाते. फुल,गजरा किंवा वेणी देऊन तिला नमस्कार केला जातो. तिला वाण दिले जाते. वाण देणे हे त्यागाचे प्रतीक आहे. घरी आलेल्या दुर्गारूपी सुवासिनीच्या पूजनानंतर तिला तन मन धन समर्पित करत आहोत या भावाने प्रतीकात्मक वस्तू म्हणून वाण दिले जाते. गेल्या काही वर्षांपासून हळदी कुंकूंचे कार्यक्रम सार्वजनिकरित्याही साजरे केले जाऊ लागले आहेत. हौसिंग सोसायट्या, सार्वजनिक उत्सव मंडळे, महिला बचत गट, मंदिर समित्या, राजकीय पक्ष, संघटना यांच्यावतीने प्रतिवर्षी हळदी कुंकूंचे कार्यक्रम आयोजित केले जातात. यानिमित्ताने काहीनाकाही वस्तू वाण म्हणून दिली जाते. बजेट ठरवून वाण म्हणून दिल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये बऱ्याचदा फण्या, प्लास्टिकचे डबे, प्लॅस्टिकच्या डिशेश, स्टीलच्या वाट्या, चमचे, साबण, साबणघर यांसारख्या असात्त्विक वस्तू दिल्या जातात. सुवासिनीला हळद कुंकू लावताना आदिशक्ती म्हणून तिचे पूजन केले जाते अशा आदिशक्तीला असात्त्विक वस्तू वाण म्हणून देणे अयोग्य आहे. हळदी कुंकू हा धार्मिक कार्यक्रम असल्याने वाण म्हणून दिल्या जाणाऱ्या वस्तूही सात्विक असायला हव्यात. उदबत्या, उटणे, कापूर, वाती, पोथी, देवतांच्या कथा आदी सात्विक वस्तू भेट म्हणून द्याव्यात. सार्वजनिक हळदी कुंकू साजरा करताना आयोजकांकडून स्त्रियांना आकर्षित करण्यासाठी गाण्यांच्या भेंड्या, संगीत खुर्ची, नाव घेण्याच्या स्पर्धा यांसारखे मनोरंजनाचे कार्यक्रम हळदी कुंकू समारंभाच्या सोबतीला ठेवले जातात. यातून मनोरंजनाखेरीज अन्य काहीच साध्य होत नाही. सध्याची सामाजिक स्थिती पाहता स्त्रियांवरील अत्याचाराचा आलेख दिवसागणिक चढतो आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे सध्याच्या मुली भारतीय संस्कृतीपासून दुरावू लागल्या आहेत. पुरुषांशी बरोबरी करण्याच्या नादात स्वतःतील शक्तीसम स्त्रीत्वाचा त्यांना विसर पडू लागला आहे, दिवसाढवळ्या मुलींचे अपहरण होऊ लागले आहे, स्त्रियांमधील भावनिकतेचा गैरफायदा घेऊन त्यांची फसवणूक केली जाऊ लागली आहे. लव्ह जिहाद सारखे संकट प्रत्येक क्षेत्रात सावज शोधत आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## MPSC परिक्षेत...

म्हणून ओळखले जात होते. त्यांनी इंग्रजी व्याकरणावर आधारित अनेक पुस्तके लिहिली असून स्पर्धा परीक्षा क्षेत्रात त्यांची वेगळी ओळख होती. त्यांच्या अचानक मृत्यूमुळे प्रशासकीय वर्तुळात तसेच विद्यार्थी आणि वाचकांमध्ये शोककळा पसरली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा बीड ग्रामीण पोलीस कसून तपास करत असून सर्व शक्यता तपासल्या जात आहेत. घटनास्थळावरील पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल कॉल डिटेल्स तसेच सहकाऱ्यांचे जबाब नोंदवले जात आहेत. मृत्यूमागचे नेमके कारण लवकरात लवकर समोर यावे, अशी मागणी नातेवाईकांसह नागरिकांकडून केली जात आहे. सध्या तरी सचिन जाधव यांचा मृत्यू हा एक गूढ बनला असून पोलिस तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'ज्ञानराधा बँक'...

◆ पान ९ वरून पुढे...

अपघातामुळे काही काळ नेकनूर–येळंब रस्त्यावर वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत केली. या अपघाताची नोंद संबंधित पोलीस ठाण्यात करण्यात येत असून अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वेग, रस्त्याची परिस्थिती अथवा निष्काळजीपणा यापैकी कोणते कारण होते, याचा तपास पोलीस करत आहेत. ज्ञानराधा मल्टीस्टेट बँक घोटाळा प्रकरणातील आरोपींच्या प्रवासादरम्यान झालेल्या या अपघातामुळे परिसरात खळबळ उडाली असून, या घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

## माजी मंत्री...

पाहून अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. मात्र त्याविरुद्ध जिल्हा सत्र न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यावर धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी केलेल्या अर्जावर दोन्ही बाजूंचे

◆ पान ९ वरून पुढे...

म्हणणे न्यायालयाने ऐकल्यानंतर स्थगिती देण्यात आली असून, श्री मुंडे यांना अपील करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे. न्यायालयाचा स्थगिती निकाल स्वयंस्पष्ट असून तो न्यायालयाच्या पोर्टलवर देखील उपलब्ध आहे. मात्र याबाबत अर्धवट माहितीच्या आधारे कुणीतरी खोडसाळपणाने चुकीचे वृत्त प्रसिद्ध केले असून, संबंधितास कायदेशीर नोटीस पाठवणार असल्याचे मुंडे यांचे वकील ड. अशोक कवडे यांनी सांगितले आहे.

## अंबाजोगाईकरांचा....

आहे. या यशस्वी उपक्रमाबद्दल आणि नियोजित वेळेत काम मार्गी लावल्याबद्दल नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे. ही योजना पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर भविष्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागणार नाहीत, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## रासेयो स्वयंसेवकांनी...

एस. एस. साखरे, धारुर शहराचे स्वीकृत नगरसेवक श्री. मयूर सावंत, पत्रकार अविनाश जगताप, उपप्राचार्य प्रा. एम. ए. जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड उद्घाटन समारंभाची सुरूवात राजमाता जिजाऊ व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव यांनी या शिबिराच्या माध्यमातून गावामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांचे स्वरूप सांगितले. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. विजयकुमार कुंभारे यानंतर आभार प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी मानले. या समारंभास किल्लेधारूर शहर व परिसरातील ग्रामस्थ, रासेयो स्वयंसेवक यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## २४ तासांत ....

करण्यात आले.ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली झडख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, पोशी योगेश निर्धार, गजानन चौधरी तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, बीडच्या पथकाने केली. AHTU पथकाच्या तत्परतेमुळे अल्पवयीन पीडितेला सुरक्षिततेचा दिलासा मिळाला असून आरोपीवर कायदेशीर कारवाई सुरू आहे.

## खरात आडगाव...

सोडल्या जाणाऱ्या काजळीमुळे तीव्र वायुप्रदूषण होत आहे. या काजळीचा परिणाम थेट नागरिकांच्या श्वसनसंस्थेवर होत असून लहान मुले, महिला व वृद्धांमध्ये श्वसनाचे आजार वाढत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. काजळी श्वसनावाटे शरीरात जात असल्याने अनेकांना दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवत आहेत. ग्रामपंचायतीचा आणखी एक गंभीर आरोप म्हणजे, जय महेश साखर कारखाना ग्रामपंचायत अधिकार क्षेत्रात अवैधरित्या कार्यरत असून आजपर्यंत ग्रामपंचायतीकडे एकही रुपयाचा कर भरणा करण्यात आलेला नाही.याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही कारखाना प्रशासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही. या सर्व बाबी लक्षात घेता, ग्रामपंचायत खरात आडगावच्या वतीने दि. २६ जानेवारी २०२६ रोजी ऊस वजन काटा बेमुदत बंद ठेवून उपोषण** करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिणामांची तसेच होणाऱ्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी संबंधित साखर

◆ पान ४ वरून पुढे...

कारखान्यावर राहील, असे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे.दरम्यान, या आंदोलनामुळे परिसरातील साखर वाहतूक आणि कारखान्याच्या कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून, प्रशासन व कारखाना व्यवस्थापन याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रोटरी क्लब...

तालुकास्तरीय वैयक्तिक व समुहनृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तालुकास्तरीय वैयक्तिक नृत्य स्पर्धा आज रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी वेळ – सकाळी १० वाजता तर तालुकास्तरीय समूहनृत्य स्पर्धा वेळ – दुपारी ३ वाजता, दोन्हीही स्पर्धा आद्यकवि मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई (जि.बीड) या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या स्पर्धा लहान गट इयत्ता १ ली ते ४ थी, मोठा गट इयत्ता ५ वी ते १० वी, खुला गट इयत्ता ११ वी पासून पुढील मुली व महिलांसाठी आणि दिव्यांग गट – शारीरिक अपंगत्व प्रवर्गातील सर्व विद्यार्थी या गटात होणार आहेत. प्रत्येक गटामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय या प्रमाणे पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेत लहान, मोठा, खुला, दिव्यांग गटाचा समावेश आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी रो.भिमाशंकर शिंदे (मोबाईल नंबर – ९७६५१४४८७३), रो.सुनील व्यवहारे (मोबाईल नंबर – ९३२५७६२८१७), प्रा.अनंत कांबळे (मोबाईल नंबर – ८६००१३४००७) आणि गणेश तौर (मोबाईल नंबर – ९४२३८८६५२८), प्रा.सौ.आरती भिमाशंकर शिंदे (लिंबगावकर), सुशील कुंबेफळकर, विक्रमसेन आगळे, गोविंद जगधने, बालासाहेब वरने, बळीराम उपाडे, सत्यम जोगदंड यांच्यासह रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई व नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमी यांनी पुढाकार घेतला आहे.

## धनगर समाजाच्या...

समाजबांधवांचा जाहीर पाठिंबा असून, सर्व समाजबांधवांनी या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड तसेच नेकिनूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी, रविंद्र निर्मळ, सुरेश निर्मळ, बाळासाहेब मुळे, बाळासाहेब मोरे पाटील, अनंतकाका

◆ पान ४ वरून पुढे...

मुळे, हरिओम क्षीरसागर, संदीप मुळे, शहादेव धलपे, गणपत तागड, रामदास मुळे, रामचंद्र मुळे,महावीर मुळे, संतोष वाणी, विनायक वाणी, संजय सुकाळे, प्रविण मुळे, जीवन मुळे, रोहन तागड, रामराजे मुळे, नवनाथ मुळे, केशव गिरे, कल्याण कोकाटे, दत्ता मुळे, आप्पा मुळे अमोल पितळे, बंडू ढगारे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑलिम्पिकवीर...

महाविद्यालय कटिबध्द आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. ए.एस.खान, कमवि डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भागचंद सानप, डॉ. शेख शकील रहिम, डॉ. ज्ञानेश्वर घोडके, डॉ. प्रियंका नवले, प्रा. अमृतसिंग बिसेन तसेच क्रीडा विभागातील सर्व कर्मचारी तसेच खेळाडू मोठया संख्येने उपस्थित होते.

## लोकनेते सुंदररावजी...

तांत्रिकदृष्ट्या योग्य व वाहनांची घेतलेली वजने बरोबर येत असले बाबत अभिप्राय आणि वजन काट्यामध्ये कोणताही दोष नसल्याबाबतचा अभिप्राय विशेष पथकाने नोंदवला आहे .यावेळी पथका समवेत कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री आर .सी .बडगुजर साहेब ,श्री एस.एस.शिनगारे जनरल मॅनेजर (ईंजिनिअरीग),मुख्य शेतकरी अधिकारी श्री आर .आर .देशमुख ,केनयार्ड सुपरवायझर श्री आर.पी.चाटे व ऊस उत्पादक शेतकरी वाहतूक ठेकेदार उपस्थित होते.

## टी.बी.गिरवलकर...

– ८९.१८ टक्के (द्वितीय), अंकिता अशोक हाके – ८८.९४ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – संगणक अभियांत्रिकीचे विद्यार्थी जान्हवी मुकुंद कराड – ८६.३५ टक्के (प्रथम), शर्वरी शिरीष हालकंचे – ८६.०० टक्के (द्वितीय), हर्षसिंग किरणसिंग रेखावल – ८५.०० टक्के (तृतीय), तृतीय वर्ष शाखा – इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी पांडुरंग प्रेमराज पवार – ९१.६५ टक्के (प्रथम), वैष्णवी श्रीधर नागरगोजे – ९०.४७ टक्के (द्वितीय), अजित नरसिंग मुंडे – ८८.०० टक्के (तृतीय), द्वितीय वर्ष शाखा – इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी आदित्य अंगद औताडे – ८२.३५ टक्के (प्रथम), प्रसाद लहू गायकवाड – ८१.५३ टक्के (द्वितीय), गौरी संजय फुन्ने –

◆ पान ४ वरून पुढे...

७९.२९ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी अमरजा गंगाराम कांबळे – ८२.२४ टक्के (प्रथम), अक्षता व्यंकटराव चव्हाण – ८०.३६ टक्के (द्वितीय), शुभम सुभाष मुंडे – ८०.२४ टक्के (तृतीय), तृतीय वर्ष शाखा – मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी भूमिका गोपाल परदेशी – ८१.५३ टक्के (प्रथम), आदित्य रविंद्र चव्हाण – ८१.४१ टक्के (द्वितीय), ज्ञानेश्वरी बळीराम सिरसाट–७९.२९ टक्के (तृतीय), द्वितीय वर्ष शाखा – मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी सायली संतोष वायसे – ८२.६७ टक्के (प्रथम), ओमकार अशोक रेणावरकर – ७८.७८ टक्के (द्वितीय), रितेश संभाजी घोरपडे – ७६.६७ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी मंथन दत्तात्रय महामुनी – ८२.२४ टक्के (प्रथम), श्रद्धा मारूती कुकर – ७७.७७ टक्के (द्वितीय), पृथ्वीराज विक्रम मोरे – ७७.६५ टक्के (तृतीय), द्वितीय वर्ष शाखा – सिव्हिल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी आदित्य जगन्नाथ दराडे – ८५.६५ टक्के (प्रथम), सुमित दशरथ चटप – ८१.६५ टक्के (द्वितीय), शिवप्रसाद वैजनाथ गिरवलकर – ७६.७१ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – सिव्हिल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी ओम मुकुंद साबणे – ९१.२९ टक्के (प्रथम), सुरज संदेश होळंबे – ८५.१८ टक्के (द्वितीय), दर्शना दिलीप चौरे – ८२.०० टक्के (तृतीय), द्वितीय वर्ष शाखा – इलेक्ट्रॉनिक्स ऍण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे विद्यार्थी गायत्री सदाशिव मुंडे – ९०.०० टक्के (प्रथम), अंजली नरहरी घायतिडक – ८४.८२ टक्के (द्वितीय), पियुष संतोष राऊत – ८२.१२ टक्के (तृतीय), प्रथम वर्ष शाखा – इलेक्ट्रॉनिक्स ऍण्ड ण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे विद्यार्थी वैष्णवी नानाभाऊ बडे – ८२.१२ टक्के (प्रथम), चेतन सुरेश रोगी – ८१.४१ टक्के (द्वितीय), पायल विठ्ठल नाकुरे – ७७.५३ टक्के (तृतीय) क्रमांक मिळवला आहे. या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, सचिव माधवराव पाटील (टाकळीकर), सहसचिव सुनील मिटकरी आणि सर्व सन्माननीय सदस्य तसेच कॅम्पस डायरेक्टर डॉ.बी.आय.खडकभावी, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कार्यवाह प्राचार्य एन.ए.रावबावले, पॉलिटेक्निकचे प्राचार्य एल.व्ही.बगले, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. यासंदर्भात बोलताना कॅम्पस डायरेक्टर डॉ.बी.आय.खडकभावी यांनी सांगितले की, हे पॉलिटेक्निक मागील ४२ वर्षांपासून ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रशिक्षण देत आहे. संस्थेचे अनेक विद्यार्थी आज देश–विदेशात विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असून पॉलिटेक्निकचा निकाल दरवर्षी उंचावत आहे. त्यामुळे संस्थेचे नांव महाराष्ट्रात अग्रस्थानी आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# श्री शंभुलिंग शिवाचार्य महाराज मठात तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत विकास कामे करणार

### नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांची ग्वाही

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील रविवार पेठ विभागातील लिंगायत समाजाच्या श्री शंभुलिंग शिवाचार्य महाराज मठात तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत विविध प्रकारची विकास कामे करण्यात येतील अशी ग्वाही नवनिर्वाचित नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी दिली.



अंबाजोगाई शहराच्या नगराध्यक्ष पदी विजयी झाल्याबद्दल लिंगायत व जंगम समाजाच्या वतीने नंदकिशोर मुंदडा यांचा नुकताच श्री.शंभुलिंग शिवाचार्य महाराज मठ संस्थान येथे श्री शंभुलिंग शिवाचार्य महाराजांच्या हस्ते व समस्त वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला होता. याच कार्यक्रमात नगरसेवक संजय गंभीरे, गणेश देशमुख, संतोष काळे, शेख मुस्तकीम बागवान यांचा ही सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना नंदकिशोर मुंदडा बोलत होते. यावेळी विस्ताराने बोलतांना नंदकिशोर मुंदडा पुढे म्हणाले की, अंबाजोगाई शहरात उत्तम प्रतीच्या नागरी सुविधा देण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. तसेच मठ संस्थान साठी तीर्थक्षेत्र विकास योजनेतून विविध विकास कामे केली जातील असे सांगून त्यांनी लिंगायत व जंगम समाजा चा सध्याचा ज्वलंत प्रश्न म्हणजे रुद्र भूमी स्मशानभूमी बाबत भाष्य केले, त्यांनी सांगितले की, शासनाने दिनांक ५ फेब्रुवारी २०२४ व ७ एप्रिल २०२३ रोजी घेतलेले निर्णय व ७ एप्रिल २०२४ रोजी ची अधिसूचना करण्याबाबत लिंगायत समाजाने दिलेल्या निवेदनानुसार बाराखांबी (सकलेश्वर मंदिर) येथील शासनाने संपादित केलेल्या जमिनीवर व अंत्यविधी करून दफन केलेल्या ठिकाणी कसल्याही प्रकारचे उत्खनन करू नये याबाबत शासनास यापूर्वीच आ. नमिता मुंदडा यांनी लेखी पत्र देऊन कळवलले असल्याचे त्यांनी सांगितले. या सत्कार कार्यक्रमात श्री. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांनी समाज बांधवांना मार्गदर्शन करून आशीर्वाद दिले. या कार्यक्रमास विश्वस्त मंडळाचे सचिव विजयकुमार चलवदे, बाबासाहेब बुरांडे, दिलीप बुरांडे, गणेश टुरके, ॲड. संजय व्यवहारे, महेश उरगुंडे, परमेश्वर शेटे, शिवप्रसाद राऊत, कुलदीप वाघमारे ,अशोक खंदारे, सचिन तोडकर ,जगदीश ढेले चंद्रशेखर डीगे, विजयकुमार खंदारे ,नवनाथ पोखरकर, नरेश मेहत्रे, प्रशांत स्वामी, राहुल शेटे, गंगासागर बुरांडे, यांच्यासह अनेक समाज बांधव व महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवानिवृत्त नायब तहसीलदार शंकर बुरांडे यांनी केले.

# गोरक्षनाथ प्राथमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**ढेकणमोहा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथील गोरक्षनाथ प्राथमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव सोमनाथराव बडे सर रामा भोगे संचालक खरेदी विक्री संघ बीड माजी सरपंच नागेश शिंदे, बंडु गाडीवान सरपंच ढेकणमोहा पोलीस कॉन्स्टेबल घुमरे साहेब, तावरे साहेब, गोवर्धन दराडे, संतोष जाधव , दिनेश पिसाळ सुरेश देवकते प्रमुख पाहुणे उपस्थित होते यावेळी लहान चिमुकल्यांनी लोकगीत, भक्ती गीत, कोळीगीत ,विनोदी नाटिका, मराठमोळी लावणी अशा विविध नृत्यप्रकार सादर केले तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या नाटिकांचेही सादरीकरण करण्यात आले.विद्यार्थ्यांनी सादर केलेली गाणी, समूह नृत्य आणि नाटकांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांचा सहभाग लहान मुलांपासून ते मोठ्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी उत्साहाने कार्यक्रम पाहण्याचा आनंद घेतला. पालकांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले आणि



विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळाल्याचे समाधान व्यक्त केले. हा स्नेहसंमेलन कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा आणि त्यांच्यामध्ये एकजुटीची भावना निर्माण करणारा ठरला. या वार्षिक सोहळ्याने सर्वांनाच आनंदित विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुंडे सर (मुख्याध्यापक) मनोज बडे सर , बळीराम जाधव सर, (प्राथ मुख्याध्यापक) अमोल गीते सर, प्रकाश शिंदे सर, राऊत सर, तावरे सर, खराडे सर, डोंगरे सर, सुतार सर, गीते सर, मुसळे सर, घोरड सर, चौरे सर, वाघमारे सर, कांबळे सर , एम आर मुंडे सर ,भुरके सर ,काळे सर पवार सर ,थापडे सर, तीरणकर सर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रकाश शिंदे सर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*पुणे : पिंपरी चिंचवड सार्वत्रिक निवडणूक २०२६ प्रभाग क्रमांक २५ ड मधुन श्री . मा. राहुल तानाजी कलाटे हे प्रचंड मताधिक्याने व प्रभाग क्रमांक २७ मधुन सौ.अर्चनाताई विनोद तापकीर ह्या निवडून आल्या बद्दल अभिनंदन करून शुभेच्छा देताना सह कुटुंब विनोदे परिवार छाया चित्रात दिसत आहे.*

# बीड स्वीकृत नगरसेवक ॲड गोविंद शिराळे यांचा ॲड राहुलकुमार राका यांच्यावतीने सत्कार संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या स्विकृत नगरसेवकपदी भाजपाचे जिल्हाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे यांचे चिरंजीव युवा नेते ॲड गोविंद शिराळे यांची निवड झाली असता त्यांच्या निवासस्थानी त्यांचा शाल मोत्याची माळ पुष्पगुच्छ व राम लल्ला फोटो फ्रेम देताना भाजपाचे युवा नेते तथा दि वैद्यनाथ बँक सल्लागार, दैनिक बीड वास्तव उपसंपादक व महाराष्ट्र ॲड नोटरी असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड राहुलकुमार राका, भाजपाचे वकील आघाडीचे जिल्हा सचिव व महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनचे जिल्हा कार्याध्यक्ष ॲड रामजी दहिवाळ, भाजपाचे नेते माजी नगरसेवक /माजी शहराध्यक्ष ॲड विजयकुमार धांडे, सामाजिक कार्यकर्ते व दैनिक बीड वास्तव चे उपसंपादक विशालराव इंगोले दिसत आहेत.

# विद्यार्थ्यांनो सुशिक्षीत, सुसंस्कारीत आदर्श बनुन समाजापुढे उभा रहा : प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

आजच्या काळात प्रत्येकजन सुशिक्षीत आहे परंतु सुसंस्कारीत होण्यासाठी प्रयत्न करावे लागत आहे. तंत्रज्ञान व बदलता काळ यामुळे सामाजिक मुल्ये, गुण, कला हे संपादित करण्याची गरज लागत आहे. सुसंस्कारीत व्हा. आपल्या व्यक्तिमत्वाचा समाजात ठसा उमटवा. तुम्हाला आयुष्यात जेव्हांही गरज लागेल तेंव्हा तुमच्यासाठी महाविद्यालयाचे दरवाजे कायम उघडे आहेत. महाविद्यालयाची परंपरा खुप मोठी आहे. महाविद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात यशस्वी झालेले आहेत. त्याचप्रमाणे तुम्ही ही यशस्वी व्हा व महाविद्यालयाची मान उंचवा असे प्रतिपादन सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारोह प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

बीड :सौ. के. एस. के. (काकू) कृषी महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी नामांकित कृषी क्षेत्रातील कंपनी नवभारत ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा. लि. कोल्हापूर, यांच्या वतीने कॅम्पस इंटरव्ह्यू व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

# श्रीराम कथेच्या आयोजनातून आ.सुरेश धस यांनी देव देश आणि धर्म कार्य करण्याची प्रेरणा निर्माण केली -महंत मंदार महाराज रामदास

### धार्मिक ज्ञानयज्ञाचे यापुढेही कार्यक्रम घेत राहणार: आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथे प्रभू श्री रामचंद्र संगीत श्री राम कथा ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करून मुख्य संयोजक आमदार सुरेश धस यांनी आष्टी, पाटोदा,शिरूर तालुक्यातील नागरिकांना देश, देव आणि धर्मकार्य करण्याची प्रेरणा या राम कथेच्या आयोजनातून निर्माण केली आहे. याही पुढील कालावधीमध्ये याहीपेक्षा भव्य दिव्य धार्मिक अध्यात्मिक महोत्सवाचे आयोजन व्हावे आम्ही सर्व संत मंडळी या कामी आमदार सुरेश धस यांच्या पाठीशी उभे राहू अशी ग्वाही दादेगाव येथील देवदास स्वामी मठाचे महंत मंदार महाराज रामदासी यांनी दिली. आष्टी येथील संगीत राम कथा ज्ञान यज्ञ सोहळ्यामध्ये सांगता समारंभामध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले आष्टी



येथील राम कथा ज्ञानयज्ञ सोहळा आयोजनामध्ये अल्प कालावधी असून देखील भव्य दिव्य तयारी करण्यात आली आमदार सुरेश धस यांचे कल्पक नेतृत्व प्राजक्ताताई सुरेश धस यांची प्रेरणा आणि कार्यकर्त्यांचे खंबीर पाठबळ यामुळे हा महोत्सव अत्यंत यशस्वी झाला आहे. आमदार सुरेश धस यांना शक्ती बुद्धी आणि युक्ती याद्वारे या मतदारसंघातील सर्वसामान्य जनता शेतकरी शेतमजूर यांच्यासाठी उत्तम उत्तम कार्य करण्याची प्रेरणा मिळावी अशी प्रभू रामचंद्राकडे आपण प्रार्थना करत आहोत. असेही त्यांनी शेवटी सांगितले.आजचा राम कथेच्या अंतिम निरूपण करताना मंदार महाराज म्हणाले की, प्रभू श्रीरामचंद्र राजघराण्यातील असून देखील त्यांनी धर्म कर्तव्य पार पाडण्यासाठी आदर्श घालून दिला राज धर्म सोडून वनवासात गेले सर्व सामान्य वानर सेनेला बरोबर घेऊन लंकाधिश अधर्मी रावणाचा वध केला आणि १४ वर्षे पूर्ण केल्यानंतरच राज धर्माचा स्वीकार करून मातेला दिलेले वचन पाळले सर्वसामान्य वानर सेनेच्या जीवावर त्यांनी लंकाधिपती रावणाचा पराभव केला याविषयी प्रतिपादन करताना मंदार महाराज म्हणाले की, प्रभू रामचंद्र हे राजघराण्यातील असून आदर्श वागणूक वर्तणूक याचे प्रतीक म्हणून प्रभू श्री रामचंद्र यांचे आदर्श मोठे आहेत.

आष्टी तालुक्यात संगीतमय श्रीराम कथा ज्ञानयज्ञाचा हा पावन सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. रविवार, दि. ११ जानेवारी ते शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ या कालावधीत पंचायत समिती कार्यालय प्रांगण, आष्टी येथे दररोज हजारो रामभक्तांच्या उपस्थितीत प्रभू श्रीरामांच्या जीवनातील आदर्श, मर्यादा, त्याग, कर्तव्यनिष्ठा आणि भक्तीचा गूढ अर्थ या कथामालिकेतून प्रभावीपणे उलगडला. प.पू. महंत मंदार महाराज रामदासी, श्री. देवदास स्वामी मठ, दादेगाव (ता. आष्टी, जि. बीड) यांच्या सुश्राव्य, ओजस्वी व प्रेरणादायी कथानिरूपणामुळे उपस्थित भक्तांच्या मनावर गहन आध्यात्मिक संस्कार झाले.

यावेळी बोलताना आ.सुरेश धस म्हणाले, संगीत, अभंग, कीर्तन व कथन यांच्या समन्वयातून श्रीराम कथेने समाजातील सर्व वयोगटांना आत्मिक समाधान, सकारात्मक ऊर्जा आणि जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. या ज्ञानयज्ञातून कुटुंबसंस्था बळकट करण्याचा संदेश, सामाजिक सलोखा, स्त्री-पुरुष समता, कर्तव्य आणि संस्कारांचे महत्त्व यावर विशेष भर देण्यात आला. विशेषतः मकर संक्रांतीच्या दिवशी झालेल्या विशेष कथाकालावधीत भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आध्यात्मिक आनंदाचा अनुभव घेतला. आज या पवित्र संगीतमय श्रीराम कथा ज्ञानयज्ञाची विधिवत सांगता संपन्न झाली. सांगता कार्यक्रमानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित सर्व रामभक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच या दिव्य ज्ञानयज्ञासाठी अखंड सेवा देणाऱ्या महाराजांचा यथोचित सत्कार केला. या संपूर्ण श्रीराम ज्ञानयज्ञात मराठवाडा भूषण लोकनेते आ.सुरेश अण्णा धस प्रतिष्ठान संयोजन समितीने अतिशय सुंदर नियोजन करत अथक परिश्रम घेतले.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २६/२०२६**

**कैलास पि. बाबुराव सोनवणे वि. साखराबाई भ्र. बजरंग सोनवणे**

**अर्जदार – कैलास पि. बाबुराव सोनवणे, वय ४९ वर्षे, धंदा मजुरी, रा. सुतार गल्ली गेवराई ता. गेवराई जि.बीड.**

विरूध्द

गैरअर्जदार – श्रीमती साखराबाई भ्र. बजरंग सोनवणे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुतार गल्ली गेवराई ता. गेवराई जि. बीड.

ज्याअर्थी **मयत बजरंग पि. लक्ष्मण सोनवणे, रा. सुतार गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २०/०५/२०१४ रोजी रा. सुतार गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत बजरंग पि. लक्ष्मण सोनवणे, रा. सुतार गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पुढील तारीख:– २०/०२/२०२६**

**(मार्फत ॲड. आर. ए. जोशी, गेवराई)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १०१/२०२६**

**संतोष नागरगोजे व इतर वि. निरंक**

मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

**अर्जदार: (१) संतोष पि. विष्णु नागरगोजे, वय- ३९ वर्षे, धंदा- शेती, रा. वडगांव गुंधा ता. जि. बीड. २) श्रीमंत पि. विष्णु नागरगोजे वय ३७ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर. ३) विष्णु पि. आन्नाभाऊ नागरगोजे, वय ५८ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी **मयत नामे शिलाबाई विष्णु नागरगोजे या दिनांक १२ / १२ / २०२५ रोजी मयत** झालेल्या आहेत. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ३ हे मयताचे पती आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे शिलाबाई विष्णु नागरगोजे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत शिलाबाई विष्णु नागरगोजे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख २७/०२/२०२६ आहे.**

आज दिनांक १६/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(ॲड. एस. एस. महाजन यांच्यामार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** — दि. 17/01/2026

अर्जदार : साईराज मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. अंबाजोगाई

**विरूद्ध — गैरअर्जदार**

1) ल. अर्ज क्र. 01/2025 1) प्रसाद शंकर बुरांडे 2) शंकर रामलिंगअप्पा बुरांडे दोघे रा. कल्यानकर नगर, चौसाळकर कॉलनी, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड 3) योगेश्वर वैजनाथ कस्तुरे रा. योगेश्वरी कॉलेज मागे, अमृतेश्वर नगर, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड

2) लवाद अर्ज क्र. 02/2025 1)शेख गफ्फार याकुब, (मयत - वगळले) 2) शेख हुसेन गफ्फार 3) पठण अस्लम अकबरखान रा. रविवार पेठ, दमगानपुरा, करबला वेस, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड

3) लवाद अर्ज क्र. 03/2025 1)श्रीकांत बलभीम डोने रा. डोने निवास, लहुदास चौक, परशुराम नगर, साकुड रोड, अंबाजोगाई 2) पठाण महेबुब अमीर हमजा रा. सुगाव ता. अंबाजोगाई 3) अजय ज्ञानोबा पवार रा. चतुरवाडी, चोठेवाडी, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड

4) लवाद अर्ज क्र. 04/2025 1) प्रविण भरत फड रा. श्रीकृष्ण निवास, माणिक नगर, परळी ता. परळी जि. बीड 2) बालासाहेब ज्ञानोबा भांगे रा. वागदरी ता. रेणापुर जि. लातुर 3) सचिन हरिराम केंद्रे रा. केंद्रेवाडी ता. अंबाजोगाई जि. बीड

5) लवाद अर्ज क्र. 05/2025 1) अन्नमवार सचिन हुल्लप्पा रा. हाउस नं. 3-7-691/6, आनंद प्लाजा, न्यू बंदाघाट रोड, मल्टीपर्पज हायस्कूल जवळ, वजिराबाद, नांदेड 2) भूसेवार गिरीशकुमार व्यंकटराव रा. चिखलवाडी, गुरूद्वार गेट नं. 2 नांदेड 3) जटाळे संतोष पंढरीनाथ रा. घर नं. 4-612/539 वसरणी, जिल्हा परिषद शाळेसमोर, न्यू नांदेड

6) लवाद अर्ज क्र. 06/2025 1) मुंडे पंडित तातेराव रा. वाघलगाव, पोटा ता. सोनपेठ जि. परभणी 2) स्वामी नंदकिशोर रेवण रा. रविवार पेठ, अंबाजोगाई 3) बुरांडे शंकर गुरूलिंगअप्पा रा. मंगळवार पेठ, भगतसिंग चौक, तहसील समोर, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि. बीड

7) क्र. 07/2025 1) कुंडगर नितीन दाजीबा 2) शिंदे सुग्रीव बाबुराव 3) कुंडगर दाजीबा लक्ष्मण सर्व. रा. कुराणवाडी ता. अंबाजोगाई जि. बीड

( टीप : वरील प्रत्येक लवाद अर्जामध्ये क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपणा पैकी काहींनी घेऊन गैरहजर राहिलात. काहींनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 17/02/2026 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही, असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांनिशी दिली आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

